भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2023 CE 820700

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

23 JAN 2024

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

जिल्हा कोषागार ठाणे

// करारनामा //

| | | |
|---|---|---|
| करारनामा लिहुन घेणार :- | उप-आयुक्त (वाहन)<br>मिरा भाईंदर महानगरपालिका<br>भाईंदर (प.) ता.जि.ठाणे | प्रथम पक्षिय |
| करारनामा लिहुन देणार :- | मे. सिताराम ट्रॅव्हल्स<br>A/202 सालासर क्लासिक को.ऑ.हौ.सो.लि.<br>नगरभवन जवळ, फाटक रोड<br>भाईंदर (प.) पिन 401101 | व्दितीय पक्षिय |

कारणे करारनामा लिहुन देण्यात येतो की, मिरा भाईदर महानगरपालिकेने इंधनासह खाजगी वाहने वाहनचालकासह पुरवठा करून संपुर्ण सेवा भाडयाने घेणेकामी दि. 30/01/2024 रोजी दै. सिटीन्युज, दै. तरुण भारत, दै. कोकण सकाळ या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन महानगरपालिकेचे निविदा पत्रकांमध्ये आपण दर लिहुन दिलेले आहेत. त्या निविदेतील अटी शर्तीनुसार इंधनासह खाजगी वाहने वाहनचालकासह पुरवठा करून संपुर्ण सेवा भाडयाने घेणेकामी मा. प्रशासकिय ठराव क्र.407 दि. 05/03/2024 अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

For SITARAM TRAVELS

Proprietor

| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | प्रति दिन 100 कि.मी.चे दर Per Day 100 km Rate (GST वगळुन) | 100 कि.मी नंतर प्रति कि.मी दर After 100 km Rate (GST वगळुन) | प्रति महा 3000 कि.मी.चे दर Per Month 3000 km Rate (GST वगळुन) | 3000 कि.मी. नंतर चे दर After 3000 km Rate (GST वगळुन) |
|---|---|---|---|---|---|
| 1) | MUV VEHICLES (A/C) | 3710 | 9 | 84374 | 8 |
| 2) | SUV VEHICLES (A/C) | 2710 | 9 | 64107 | 8 |
| 3) | SUV VEHICLES (Non A/C) | 2611 | 9 | 62107 | 8 |
| 4) | SEDAN VEHICLES (A/C) | 2911 | 8 | 59107 | 7 |
| 5) | SEDAN VEHICLES (Non A/C) | 2811 | 8 | 56107 | 7 |
| 6) | HATCH BACK VEHICLES (A/C) | 2411 | 8 | 47107 | 7 |
| 7) | HATCH BACK VEHICLES (Non A/C) | 2311 | 8 | 44107 | 7 |
| 8) | JEEP VEHICLES (A/C) | 3157 | 9 | 52679 | 8 |
| 9) | JEEP VEHICLES (Non A/C) | 3111 | 9 | 50893 | 8 |

सदर कामाकरिता GST लागु असल्यास महानगरपालिकेमार्फत GST रक्कम देण्यात येईल.

अटीशर्ती :-

1. पुरवठा करण्यात येणारी सर्व वाहने ही टी-परमिट असणे बंधनकारक राहिल.
2. करारातील दर एका वर्षाकरिता ग्राहय राहतील. सदर कालावधीमध्ये इंधनाचे, ऑईलचे दर व शासकिय कर वाढल्यास ते भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल. याकरिता महानगरपालिका इंधनाचे वाढीव दर व शासनाचे वाढीव कर देणार नाही.
3. पुरवठादाराने करारनामा लिहुन दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानंतर तात्काळ ठरवुन दिलेल्या वाहनांचा पुरवठा केला पाहिजे. कामाच्या ठिकाणी वाहन सुरु झाल्यापासुनचे किलोमीटर ते काम संपण्याच्या ठिकाणचे किलोमीटरच्या नोंदी लॉगशिट मध्ये दररोज घेऊन त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी घेऊन अधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणित केलेले प्रमाणपत्र दरमहा वाहन विभागात जमा केल्यानंतरच ठेकेदाराचे देयक अदा केले जाईल.
4. करारामधील नमुद वाहने व यंत्रसामग्री स्वत:च्या मालकीचे असणे आवश्यक आहे अथवा अन्य व्यक्ती / संस्थेकडुन वाहने उपलब्ध करून घेणार असल्यास संबंधित व्यक्ति / संस्थेसोबत त्याबाबत करारपत्र करणे आवश्यक आहे.
5. महानगरपालिकेने मागणी केलेल्या प्रमाणे वाहन पुरवठादाराने विहित मुदतीत पुरवठा न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पुरवठादाराकडुन वाहने भाडयाने घेईल आणि ज्यादा होणारा खर्च सुरक्षा अनामत मधुन अथवा देयकातुन व इतर कोणत्याही कायदेशीर पध्दतीने मंजुर पुरवठादाराकडुन वसुल केला जाईल.

For SITARAM TRAVELS

Proprietor

6. महानगरपालिकेच्या आर्थिक वर्षात पुरवठादाराने वाहनांचा पुरवठा खंडित केल्यास प्रती दिन प्रती वाहन रु. 2000/- दंडनीय शुल्क आकारण्यात येईल अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास किंवा वाहने पुरवठयाबाबत खात्याकडुन तक्रार आल्यास पुरठादाराची अनामत रक्कम जप्त करून त्याची वार्षिक निविदा रद्द करण्यात येईल.
7. मंजुर निविदाधारकाकडुन नियमाप्रमाणे आयकर व अन्य देय होणारे कर बिलातुन कापुन घेण्यात येतील.
8. सदर निविदेचा कालावधी कार्यादेश दिल्यापासुन 1 वर्षाचा असेल.
9. पुरवठा करण्यात येणारी वाहने कार्यादेशात नमुद कालावधीच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल.
10. वाहनांसाठी लागणारे वाहनचालक, इंधन, ऑईल, अत्यावश्यक स्पेअरपार्टस व मेन्टेनन्स इ. खर्च व वाहनचालकाच्या देयकाची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल. तसेच ठेकेदाराने वाहने वेळोवेळी सर्विसिंग, ग्रीसिंग करून चालु, स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे बंधनकार राहिल.
11. वाहनांचे टायर्स, बॅटरी कधी लावलेले / बसवलेले आहेत. त्याचा कालावधी व कागदपत्रे विचारणा केल्यास सादर करणे बंधनकारक असेल.
12. सर्व वाहनचालकाकडे वैध आर.टी.ओ. लायसन्स असणे बधनकारक राहिल तसेच वाहन चालविण्याचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक राहिल. तसचे वाहनचालकांच्या परवान्याच्या सत्यप्रती सादर करणे बंधनकारक राहिल.
13. ठेका वाहनांवर वाहनचालकाचे नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र व फिटनेस सर्टिफिकेट देणे बंधनकारक राहिल.
14. व्दितीय पक्षाने पुरविलेल्या ठेका वाहनांवर वाहनचालक काम करित असताना कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क अथवा मागणी विचारार्थ घेण्यात येणार नाही. याबाबत सदर वाहनचालाकांनी महानगरपालिकेस हमीपत्र देणे आवश्यक आहे.
15. ठेकेदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या वाहनांचे लॉगशिट मध्ये दैनंदिन किलोमीटरच्या नोंदी संबंधित अधिकाऱ्याकडुन शिकयांसहित स्वाक्षांकित करून घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
16. ठेकेदारास सुरक्षा अनामत रक्कम कार्यादेशाचे मुदतीपर्यंत अंतिम बिल अदा होईपर्यंत ठेवावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे मा. आयुक्त यांना आवश्यक वाटल्यास अधिक सुरक्षा अनामत रक्कमेची मागणी करणेत येईल.
17. पुरविण्यात आलेल्या वाहनांमध्ये काही बिघाड झाल्यास वाहन नादुरुस्त झाल्यास अथवा वाहनचालक बदली झाल्यास तात्काळ पर्यायी वाहन व वाहन चालक संबंधित अधिकाऱ्याच्या मान्यतेने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
18. वाहनावर कार्यरत असलेल्या वाहनचालकांची राहण्याची, जेवणाची व इतर सर्व भत्ते देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल, यात महानगरपालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.
19. सर्व प्रकारची जोखीम विमा पॉलिसी (कॉन्ट्रॅक्टर्स ऑल रिस्क इन्श्युरन्स पॉलिसी) उतरविण्याची, विमा नुतनीकरण तसेच आवश्यक असणारा कॉम्प्रेसिव विमा मंजुर प्रवासी संख्येनुसार निविदेच्या कालावधीत उतरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
20. कामाचे दरम्यान वाहनचालक, सहाय्य्क, मजुर अथवा कामगार यांना अनावधानाने अथवा निष्काळजीपणामुळे दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी जोखीम ही ठेकेदाराची राहिल. कोणत्याही

For SITARAM TRAVELS

Proprietor

प्रकारचा अपघात किंवा दृष्टीक्षेपात नसलेल्या घेटनेमुळे जिवित अथवा वित्तीय हानीची जबाबदारी ही पुर्णपणे ठेकेदाराची राहिल आणि महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा भरपाई देणेचे बंधनकारक राहणार नाही. इतकेच नव्हे तर याबाबतची कोणत्याही प्रकारचा न्यायालयीन विवाद ठेकेदारास निर्माण करता येणार नाही.

21. वाहने प्रती दिवस बारा तास पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच मनपाचे अधिकारी सांगतील त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार अतिरिक्त वेळेसाठी पुरवठा करणे तसेच रविवारी व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी वाहनाचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहनाचा पार्किंग चार्ज व टोल भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल, त्यासाठी वेगळे दर देता येणार नाहीत.

22. ठेकेदाराने पुरवठा केलेल्या वाहनाचे देयकाबाबत मागणी करते वेळी संबंधित अधिकाऱ्याची शिक्क्यासहित स्वाक्षरी करून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच किलोमीटरची नोंद वाहन क्रमांक, वाहनचालकाचे नाव, वाहनचालकाचा मोबाईल नंबर, नमुद करून परिपुर्ण देयक प्रतिमहा सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.

23. वाहने प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ) कार्यालयाकडे नोंदणीकृत असावे, पीयुसी, वाहनाचे इन्शुरन्स व आवश्यक ते वाहतुकीचे सर्व अदयावत परवाने प्राप्त असणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ) कार्यालय किंवा इतर संबंधित तत्सम शासकिय कार्यालयाकडील सर्व नोंदणीची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

24. सर्व प्रकारचे शासकिय कर भरणा करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहिल. सदर कामाकरिता GST लागु असल्यास महानगरपालिकेमार्फत GST रक्कम देण्यात येईल.

25. महाराष्ट्र राज्यात लागु असलेल्या सर्व वैधानिक अर्हता ठेकेदारास बंधनकारक राहिल.

26. ठेकेदाराने वाहनांच्या वापराबाबत दैनंदिनी ठेवणे बंधनकारक आहे. तसेच बिलासोबत दैनंदिनी सादर करावी लागेल.

27. ठेकेदाराने सदर ठेक्यामध्ये नगरसेवकाचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संबध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आहे. ठेक्यामध्ये नगरसेवकाचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सहभाग आढळल्यास ठेका रद्द करण्यात येईल. तसेच झालेल्या कामाबाबत देय असलेली रक्कम व इसारा / सुरक्षा अनामत / अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

28. वाहन पुरवठा करतेवेळी वाहन / वाहनचालकाचा वाहन क्र. व भ्रमणध्वनी क्र. वाहन विभागात देणे बंधनकारक राहिल.

29. ठेकेदाराने पुरवठा केलेल्या वाहनावरील वाहनावर काम करत असलेल्या वाहनचालकाची वर्तणुक सभ्यपणाची व प्रामाणिकपणाची असावी. सदर वाहनचालकांना कंपनीचे ओळखपत्र, गणवेष परिधान करणे तसेच मोबाईल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

30. कोणत्याही कारणास्वत ठेकेदाराने काम करण्यास नकार दिल्यास ठेका रद्द करण्यात येऊन ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल व अनामत रक्कम जप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

31. ठेकेदाराने निविदा अटी / शर्ती व करारनाम्याचा भंग केला तर त्यांना कायदेशीर नोटीस देऊन खुलासा प्राप्त करून त्यांचे विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचा हक्क मिरा भाईंदर महानगरपालिकेचा राहिल.

For SITARAM TRAVELS

Proprietor

32. बालमजुर कायदा नियमांचे पालक करणे निविदाकारावर बंधनकारक आहे. याबाबत महापालिका जबाबदार राहणार नाही.
33. कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणत्याही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.
34. तातडीच्या प्रसंगी आपत्कालीन परिस्थितीत रात्रीच्या वेळी मागणी केल्यानंतर तातडीने वाहने पुरविणे आवश्यक राहिल.

सदर कराराच्या सर्व अटीशर्ती आम्ही संपुर्णपणे मान्य करून त्याकरिता उभयपणे सहया करण्यात येत आहे.

सदर करारनामा आज दि.11/03/2024 रोजी चांगल्या मनस्थितीत लिहुन दिला असे.

SITARAM TRAVELS
Government Contractor

| करारनामा लिहुन घेणार | करारनामा लिहुन देणार |
|---|---|
| | For SITARAM TRAVELS |
| | Proprietor |
| उप-आयुक्त (वाहन) | मे. सिताराम ट्रॅव्हल्स |
| मिरा भाईंदर महानगरपालिका | A/202 सालासर क्लासिक को.ऑ.हौ.सो.लि. |
| भाईंदर (प.) ता.जि.ठाणे | नगरभवन जवळ, फाटक रोड |
| | भाईंदर (प.) पिन 401101 |

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सन 20२३ /20२४ करारनामा नोंदवही
अनु.क्र.१०६ दि. १४/ 03 /२४ अन्वये
नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका